24-03-2025-Dai-01aa_DH_PAN_01_04_2016-1.qxp 23-03-2025 23:34 Page 1




खासगी बस मालक आंदोलन तीव्र करणार

पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड



हैदराबादचा 'शानदार' विजय

पान ४ वर

वेर्णा, सोमवार, २४ मार्च २०२५ | पान ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 201 | Verna, | facebook.com/dainikherald | Monday 24 March 2025 | Pages 4 | ₹ 4

# ओल्ड गोव्याची ओळख वाचवण्यासाठी धडपड सुरू!

## ऐतिहासिक वारसा संरक्षणासाठी नागरिकांचे आंदोलन

■ टीम दैनिक हेराल्ड :

**जुने गोवे, दि. २३ : बॉम जीझस बॅसिलिकासारख्या ऐतिहासिक स्थळांच्या जतनासाठी जुने गोव्यात स्थानिक नागरिक आणि सेव्ह ओल्ड गोवा ॲक्शन कमिटीच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत प्रस्तावित मॉलच्या विरोधात जोरदार निदर्शने केली. हा प्रकल्प ऐतिहासिक चर्चपासून अवघ्या १०० मीटर अंतरावर असून, पर्यटन विभागाने हे बांधकाम सुरू केल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.**



या आंदोलनात सुमारे ७०० नागरिकांनी सहभाग घेतला. मेळाव्याला संबोधित करताना सामाजिक कार्यकर्त्या जॅकलिन फर्नांडिस म्हणाल्या, येथे पूर्वी घनदाट वृक्ष होते, मात्र आता फारशी झाडे उरलेली नाहीत. फलकांवर पार्किंग प्रकल्पाचा उल्लेख असला तरी मोठ्या प्रमाणावर झाडांची कत्तल का केली जात आहे? येथे पुरातत्त्वीय तोफा सापडल्यानंतरच आम्हाला या जागेचे महत्त्व लक्षात आले. पण आम्हाला आश्चर्य वाटते की, बेकायदेशीर बंगला उभारला जात असताना सरकार झोपले होते का?

इतिहासकार योगेश नार्वेकर यांनी जुन्या गोव्याच्या महत्त्वावर प्रकाश टाकत सांगितले की, १६व्या शतकात हे शहर जगातील आठ सर्वोत्तम शहरांपैकी एक होते. मात्र, आज याचा वारसा धोक्यात आला आहे. सरकारने या भागात उत्खनन करून ऐतिहासिक महत्त्वाच्या गोष्टींचा शोध घ्यायला हवा.

पर्यावरणतज्ज्ञ फादर बोलमॅक्स परेरा यांनी विकासाच्या नावाखाली सुरू असलेल्या कथित लुटीवर भाष्य करत म्हटले की , विकास गरजेचा आहे, पण तो पर्यावरणाचा नाश करून होऊ नये. सरकारने लोकांमध्ये धार्मिक भेदभाव न करता सर्वांसाठी समान नियम लागू करायला हवेत.

पान २ ▶

# नागपूर दंगल; १०४ अटकेत; संचारबंदी उठवण्याचा निर्णय

नागपूर, दि. २३ :

औरंगजेबाच्या कबरीवरुन दोन समाजात उसळलेली दंगल पोलिसांनी आटोक्यात आणल्यानंतर नागपूर शहरातील परिस्थिती आता पूर्णतः शांत आहे . त्यामुळे लागू करण्यात आलेली संचारबंदी हटवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी दिली.

मुख्यमंत्री फडणवीस पुण्यातील पिंपरी-चिंचवड येथे पत्रकारांशी संवाद साधत होते. पाणी संवर्धनाच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या ना-नफा तत्त्वावरील पाणी फाउंडेशन च्या कार्यक्रमात ते सहभागी झाले होते.

नागपूरमध्ये कुठेही तणाव नाही. सर्व धर्मीय नागरिक शांततेत सहजीवन जगत आहेत. त्यामुळेच संचारबंदी उठवण्यात आली आहे, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. पोलीस अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, शहरात उसळलेल्या हिंसाचारानंतर सहा दिवसांनी नागपूरच्या उर्वरित चार भागांतील संचारबंदी हटवण्यात आली आहे. १७ मार्च रोजी झालेल्या हिंसाचारानंतरकोतवाली, गणेशपेठ, तहसील, लकडगंज, पाचपावली, शांतिनगर, सक्करदरा, नंदनवन, इमामबाडा, यशोधरा नगर आणि कपिल नगर या पोलिस ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी लागू करण्यात आली होती.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात असलेल्या मुघल सम्राट औरंगजेबाच्या कबरीबाबतच्या वादानंतर विश्व हिंदू परिषद (विहिंप) आणि बजरंग दलाच्या नेतृत्वाखालील निदर्शनादरम्यान पवित्र शिलालेख असलेली चादर जाळण्यात आल्याची अफवा पसरली. त्यानंतर, नागपूरच्या मध्यवर्ती भागात मोठ्या प्रमाणावर तोडफोड आणि दगडफेक झाली.

हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर २० मार्च रोजी नंदनवन आणि कपिल नगर पोलिस ठाण्यांच्या हद्दीतील संचारबंदी हटवण्यात आली, तर २२ मार्च रोजी पाचपावली, शांतिनगर, लकडगंज, सक्करदरा आणि इमामबाडा भागातील संचारबंदी उठवण्यात आली. अखेर, रविवारी नागपूर पोलिस आयुक्त रवींद्र सिंघल यांनी उर्वरित चार भागांतील (कोतवाली, तहसील, गणेशपेठ आणि यशोधरा नगर) संचारबंदी दुपारी ३ वाजता उठवण्याचे आदेश दिले. संचारबंदी हटवल्यानंतरही संवेदनशील भागांत पोलिस बंदोबस्त कायम राहणार असून, गस्त अधिक तीव्र करण्यात आली आहे, असे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## निवडक

### गायत्री चक्रवर्ती यांना हॉलबर्ग पुरस्कार

नवी दिल्ली, दि. २३ : भारतीय विद्वान आणि साहित्यिका गायत्री चक्रवर्ती स्पिवाक यांना २०२५ चा हॉलबर्ग पुरस्कार जाहीर झाला आहे. तुलनात्मक साहित्य, अनुवाद, वसाहतोत्तर अभ्यास, राजकीय तत्वज्ञान आणि स्त्रीवादी सिद्धांतातील त्यांच्या संशोधन आणि योगदानासाठी त्यांना हा पुरस्कार मिळाला आहे.

गायत्री चक्रवर्ती स्पिवाक या एक प्रसिद्ध भारतीय विद्वान, साहित्यिक सिद्धांतकार आणि स्त्रीवादी विचारवंत आहेत. त्यांनी १० हून अधिक पुस्तके लिहिली आहेत आणि अनेक पुस्तके संपादित किंवा अनुवादित केली आहेत. त्यांचे संशोधन २० हून अधिक भाषांमध्ये अनुवादित झाले आहे आणि त्यांनी ५० हून अधिक देशांमध्ये व्याख्याने दिली आहेत.

---

### कठुआमध्ये सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक

**श्रीनगर, दि. २३** : गेल्या काही महिन्यांपासून जम्मू-काश्मीरमध्ये सातत्याने दहशतवादी हल्ल्याच्या घटना घडत असल्याचं समोर येत आहे. आता कठुआ जिल्ह्यात रविवारी (२३ मार्च) संध्याकाळी दहशतवादी आणि सुरक्षा दलांमध्ये चकमक झाल्याची माहिती समोर आली आहे. कठुआतील हिरानगर सेक्टर परिसरातील भारत आणि पाकिस्तानच्या सीमेवरील सान्याल गावात संशयास्पद हालचाली आढळून आल्या. यानंतर सुरक्षा दलांनी शोध मोहीम सुरु केली. यावेळी सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाल्याची माहिती सांगण्यात येत आहे. तसेच सुरक्षा दलांनी काही दहशतवाद्यांना सर्व बाजूंनी घेरल्याचंही सांगितलं जात आहे. अधिकाऱ्यांनी सांगितलं की, घटनास्थळी अधिक सैन्य पाठवण्यात आलं असून अधिक माहितीची प्रतीक्षा आहे. रविवारी सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारास पोलीस आणि सैन्य आणि सीआरपीएफचे संयुक्त पथकाने कठुआतील हिरानगर सेक्टर परिसरात मोठी शोध मोहिम राबवली. यावेळी दहशतवाद्यांनी गोळीबार सुरु केला. त्या गोळीबाराला सुरक्षा दलांच्या जवानांनी जोरदार प्रत्युत्तर दिलं.

---

### इस्रायली हवाई हल्ल्यात राजकीय नेता ठार

तेल अवीव, दि. २३ : इस्रायली हवाई हल्ल्यात हमासचा सर्वोच्च राजकीय नेता सलाह अल-बर्दावील आणि त्यांची पत्नी ठार झाले आहेत. रविवारी सकाळी हमासने याची पुष्टी केली. दक्षिण गाझामधील खान युनिस शहरात हा हल्ला झाला. गेल्या आठवड्यात मंगळवारी इस्रायलने युद्धबंदीचा भंग केला आणि गाझामध्ये पुन्हा हल्ले सुरू केले. या हल्ल्यांमध्ये सुमारे ६०० पॅलेस्टिनी लोकांचा मृत्यू झाला आहे. इस्रायली लष्कराने सांगितले की ते गाझा शहरातील तीन भागांवर नवीन हल्ल्यांची योजना आखत आहेत आणि पॅलेस्टिनींना तेथून निघून जाण्याचा इशारा दिला. हमासने ताब्यात घेतलेल्या ५९ ओलिसांची सुटका होईपर्यंत इस्रायलने गाझामध्ये हल्ले तीव्र करण्याचे आदेश दिले आहेत. या ओलिसांपैकी २४ जण जिवंत आहेत. यापूर्वी १९ जानेवारी रोजी दोघांमध्ये युद्धबंदी झाली होती. यामध्ये, ओलिसांच्या सुटकेसाठी एक करार करण्यात आला.

# तुये रुग्णालय सुरू करा

## अन्यथा तीव्र आंदोलन कृती समितीचा सरकारला इशारा

■ *टीम दैनिक हेराल्ड*





**पेडणे, दि. २३** : कोट्यवधी रुपये खर्च करूनही तुये येथील रुग्णालय सरकारकडून अद्याप सुरू करण्यात आलेले नाही. सरकारने हे रुग्णालय खाजगी संस्थेला चालवायला देण्याचा किंवा सध्याचे कम्युनिटी हेल्थ सेंटर नव्या इमारतीत हलवण्याचा विचार केला, तर पंचक्रोशीतून तीव्र विरोध केला जाईल, असा इशारा तुये हॉस्पिटल कृती समितीने दिला आहे.

रविवारी आयोजित पत्रकार परिषदेत समितीने सरकारच्या निष्क्रियतेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. समिती गेल्या सात महिन्यांपासून हे रुग्णालय सुरू करण्यासाठी प्रयत्नशील आहे. २८ जुलै २०२४ रोजी जाहीर सभेच्या माध्यमातून या लढ्याची सुरुवात झाली. त्यानंतर ६ ऑगस्ट २०२४ रोजी स्थानिक आमदार जीत आरोलकर यांच्यासोबत समितीच्या प्रतिनिधींनी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. त्यावेळी मुख्यमंत्री सावंत यांनी डिसेंबर २०२४ च्या पहिल्या आठवड्यात रुग्णालय सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, प्रत्यक्षात कोणतीही हालचाल झाली नाही.

२९ जुलै २०२४ रोजी मुख्यमंत्री प्रसारमाध्यमांना म्हणाले होते की, रुग्णालयाच्या कामाच्या विलंबास कंत्राटदार जबाबदार आहे. त्यामुळे नवीन कंत्राटदार नेमून काम मार्गी लावले जाईल. मात्र, डिसेंबर २०२४ उलटूनही रुग्णालय सुरू न झाल्याने कृती समितीने जनजागृती मोहीम हाती घेतली. संपूर्ण पेडणे तालुक्यात बॅनर लावण्यात आले, ग्रामपंचायतींना भेटी देऊन स्थानिक लोकप्रतिनिधींशी चर्चा करण्यात आली, तसेच पत्रके वाटप करून जनजागृती करण्यात आली.

७ फेब्रुवारी २०२५ रोजी समितीने आरोग्यमंत्री तसेच पेडणे आमदार प्रवीण आर्लेकर यांच्या सोबत बैठक घेऊन निवेदन सादर केले. मात्र, यानंतरही सरकारकडून कोणतीही ठोस कृती झालेली नाही.

तुये येथील हे १०० खाटांचे रुग्णालय उभारण्यासाठी ८ नोव्हेंबर २०१२ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर आणि आरोग्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर यांच्या कार्यकाळात प्रशासकीय मान्यता मिळाली होती. मात्र, १२ वर्षे उलटूनही रुग्णालय पूर्णत्वास गेलेले नाही.

मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी कंत्राटदाराच्या अपयशामुळे काम रखडल्याचे सांगितले. परंतु नवीन कंत्राटदार नेमल्यानंतरही जर काम पूर्ण होत नसेल, तर याला जबाबदार कोण? असा सवाल कृती समितीने उपस्थित केला आहे. पेडणे तालुक्यातील मनोहर आंतरराष्ट्रीय विमानतळ सरकारला दरवर्षी दीडशे ते दोनशे कोटी रुपये महसूल देते. तरीही, त्या महसुलाचा काही हिस्सा आरोग्य सुविधांसाठी खर्च होत नसल्याचे समितीचे म्हणणे आहे.

हे रुग्णालय तातडीने पूर्ण क्षमतेने सुरू करून ते गोवा वैद्यकीय महाविद्यालयाशी (जीएमसी) संलग्न करावे, अशी मागणी कृती समितीचे सदस्य देवेंद्र प्रभूदेसाई यांनी केली. समितीचे निमंत्रक जुझे लोबो यांनी सरकारच्या जीआयडीसी विभागावर टीका केली. त्यांनी सांगितले की, जीआयडीसीने वारंवार इमारत तातडीने आरोग्य संचालनालयाकडे हस्तांतरित करण्याचे आश्वासन दिले, मात्र प्रत्यक्ष पाहणी केल्यावर अद्याप आवश्यक सुविधा कार्यान्वित नसल्याचे आढळले.

रुग्णालयाच्या इमारतीत ऑक्सिजन पुरवठा यंत्रणा बसवण्यात आलेली नाही. ही व्यवस्था उभारण्यासाठी आता पुन्हा बांधकाम फोडावे लागणार आहे. आवश्यक फर्निचर आलेले आहे , परंतु जे प्लान प्रमाणे गरजेचे आहे, उदा . १२ ओपीडी , आय सीयू युनिट्स असतील , ऑपरेशन थीएटर असतील , यासाठी लागणारी जी वैद्यकीय उपकरणे आहेत त्यापैकी एकही अद्याप आलेले नाही , सरकारने या उपकरणांसाठी निविदाही मागवल्या नाहीत. त्यामुळे सरकार रुग्णालय खाजगीकरण अथवा अर्बन हेल्थ सेंटरमध्ये विलीन करण्याच्या तयारीत आहे का, याबाबत लोबो यांनी शंका व्यक्त केली आहे. समितीचे सदस्य ॲड. प्रसाद शहापुरकर यांनी स्थानिक आमदारांचा अपुरा पाठिंबा या मुद्द्यावर बोट ठेवले. त्यांनी सांगितले

पान २ ▶

# ड्रग्ज तस्करांच्या मुसक्याआवळल्या; १०.९८ लाखाचे ड्रग्ज जप्त

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २३** : गोवा पोलिसांच्या अमली पदार्थविरोधी पथकाने धडक मोहीम राबवित वागातोर आणि हरमल येथे छापे टाकून दोन स्थानिक तरुणांना अटक केली. या कारवाईत पोलिसांनी १०.९८ लाख रुपये किमतीचे अमली पदार्थ तसेच संशयितांकडून वापरण्यात आलेली वाहने जप्त केली आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, वागातोर येथे गेल्या काही दिवसांपासून हणजूण येथील करण गोवेकर (३३) याच्यावर पाळत ठेवण्यात आली होती. अत्याधुनिक गुप्तचर यंत्रणेद्वारे त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात आले होते. गोवेकर हा अमली पदार्थ विक्री प्रकरणात सहभागी असल्याची खात्री पटल्यानंतर पोलिसांनी कारवाई करून त्याला अटक केली. त्याच्याकडून ३७ ग्रॅम कोकेन, ३७ ग्रॅम मेथॅम्फेटामाइन आणि १५ ग्रॅम उच्च दर्जाच्या एक्स्टसी गोळ्या असा एकूण ८.९८ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. याशिवाय, अमली पदार्थांची वाहतूक करण्यासाठी वापरण्यात आलेले मारुती स्विफ्ट हे वाहनदेखील पोलिसांनी जप्त केले आहे. विशेष म्हणजे, अटक करण्यात आलेला करण गोवेकर हा पूर्वी गोवा पोलिस दलात प्रशिक्षणार्थी म्हणून कार्यरत होता. मात्र, शिस्तभंगाच्या कारणास्तव त्याची सेवेतून हकालपट्टी करण्यात आली होती.


दरम्यान, हरमल येथे करण्यात आलेल्या दुसऱ्या कारवाईत पोलिसांनी बॅस्टियन रॉड्रिग्ज (२८, हरमल) याला अटक केली. त्याच्या ताब्यातून २ लाख रुपये किमतीचे २०० ग्रॅम चरस जप्त करण्यात आले. या प्रकरणी अंमली पदार्थविरोधी कायद्याच्या कलम २०(ल) अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास उपनिरीक्षक दीनदयाल रेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

या संपूर्ण मोहिमेचे नेतृत्व एएनसीचे पोलिस अधीक्षक टिकम सिंग वर्मा, उपअधीक्षक राजेश कुमार आणि पोलिस निरीक्षक साजित पिल्लई यांनी केले. राज्यात अमली पदार्थांची वाढती तस्करी रोखण्यासाठी गोवा पोलिसांच्या विविध विभागांकडून कठोर उपाययोजना राबवण्यात येत असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या घरात करोडो जळाले!

## न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्याबाबतीतला सर्वोच्च न्यायालयाचा अहवाल सार्वजनिक

नवी दिल्ली, दि. २३ :





दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याशी संबंधित आरोपांवर सर्वोच्च न्यायालयाने २२ मार्च रोजी एक अहवाल सार्वजनिक केला आहे. या अहवालात दिल्ली पोलिसांनी सादर केलेल्या काही छायाचित्रे आणि व्हिडिओंचा समावेश असून, त्यामध्ये जळालेल्या नोटा दिसत असल्याचा उल्लेख आहे. तथापि, अहवालातील काही भाग गोपनीय ठेवण्यात आला आहे.

न्यायमूर्ती वर्मा यांच्यावर त्यांच्या सरकारी निवासस्थानातून मोठ्या प्रमाणावर रोख रक्कम जप्त झाल्याचा आरोप आहे. १४ मार्च रोजी त्यांच्या निवासस्थानी स्टोअर रूमला लागलेल्या आगीत मोठी रोकड जळल्याचे आढळून आले. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश संजीव खन्ना यांनी दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश डी.के. उपाध्याय यांना प्राथमिक चौकशीचे निर्देश दिले होते.मुख्य न्यायाधीश उपाध्याय यांनी त्यांच्या अहवालात या प्रकरणाची सखोल चौकशी आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. त्याचवेळी, न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांनी हे आरोप फेटाळले असून, त्यांच्या विरोधात षडयंत्र रचले जात असल्याचा दावा केला आहे.

डी. के. उपाध्याय यांच्या अहवालानुसार, १५ मार्च रोजी सकाळी दिल्ली पोलिस आयुक्तांनी त्यांना संपर्क साधून न्यायमूर्ती वर्मा यांच्या निवासस्थानी आग लागल्याची माहिती दिली. यानंतर मुख्य न्यायाधीश उपाध्याय यांनी आपल्या सचिवाला घटनास्थळी चौकशीसाठी पाठवले. पोलिसांनी सादर केलेल्या माहितीनुसार, स्टोअर रूममध्ये जळालेल्या नोटांच्या ४-५ पोत्यांचा समावेश होता.स्टोअर रूममध्ये कोणाला प्रवेश होता, यासंबंधी चौकशी करण्यात आली असता, घरातील नोकरवर्ग व माळी यांनाच तिथे जाण्याची मुभा होती. यामुळे या प्रकरणाची अधिक सखोल चौकशी करणे गरजेचे असल्याचे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

यासंदर्भात न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांनी स्पष्टीकरण देत सांगितले की, आगीच्या घटनेच्या वेळी ते मध्य प्रदेशात होते आणि १५ मार्च रोजी संध्याकाळी दिल्लीला परतले. त्यांची मुलगी आणि कर्मचारी त्या वेळी घरात उपस्थित होते, मात्र आग विझवल्यानंतर कोणतीही रोकड आढळली नव्हती. त्यांना ही माहिती न्यायालयाने दाखवलेल्या व्हिडिओद्वारे मिळाल्याचा दावा त्यांनी केला आहे.

मी किंवा माझ्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याने स्टोअर रूममध्ये रोकड ठेवलेली नाही. कोण उघड्यावर ठेवलेल्या खोल्यांमध्ये मोठी रोकड ठेवेल, यावर विश्वास ठेवणे कठीण आहे, असे त्यांनी आपल्या उत्तरात स्पष्ट केले. त्यांचा स्टोअर रूम आणि राहत्या घरामध्ये भिंतीने वेगळेपणा असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने समिती स्थापन केली आहे. यामध्ये पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश शील नागू, हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश जी.एस. संधावालिया आणि कर्नाटक उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश अनु शिवरामन यांचा समावेश आहे.

समितीच्या चौकशीनंतर न्यायमूर्ती वर्मा यांना निर्दोष घोषित करता येईल किंवा त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली जाऊ शकते. जर त्यांनी राजीनामा नाकारला, तर समिती राष्ट्रपती आणि पंतप्रधानांना त्यांना पदावरून हटवण्याची शिफारस करू शकते. काही प्रकरणांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय अन्वेषण ब्युरोला (सीबीआय) चौकशीचे आदेश दिले आहेत.

सध्या, सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश संजीव खन्ना यांनी न्यायमूर्ती वर्मा यांच्यावर कोणतीही न्यायालयीन जबाबदारी देऊ नये, असा निर्णय घेतला आहे. तसेच, त्यांच्या गेल्या सहा महिन्यांचे कॉल रेकॉर्ड मागवण्यात आले असून, त्यांच्या फोनवरील कोणताही डेटा हटवण्यास मनाई करण्यात आली आहे.या प्रकरणाची चौकशी सुरू असून, सर्वोच्च न्यायालयाने लवकरच अंतिम निर्णय जाहीर करण्याची शक्यता आहे.

**हवामान**

कमाल : २८ किमान : २३

आर्द्रता : ७५

**बाजार भाव**

सोने : ₹ ७१,७८० (१० ग्रॅम)

चांदी : ₹ ८५,१०० (१ किलो)

**शेअर मार्केट**

सेन्सेक्स : ८२,३६५ .७७ ↑ (२३१.१६ )

निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)